| | |
|---|---|
| MHKO070002932026 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१६/२०२६**<br>**मीना शिवाजी सुर्वे तर्फे वटमुखत्यार रेश्मा सुर्यकांत गायकवाड**<br>**वि.**<br>**मोहन शंकर कांबळे** |

## नि.५ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज हा मूळ अर्जदार यांनी भारतीय वारसा अधिनियम, कलम ३८३ अन्वये दाखल केलेला असून, किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३१/२०२५ मध्ये दिनांक २९/०९/२०२५ रोजी मंजूर करण्यात आलेले वारसा प्रमाणपत्र रद्द करणेकरीता दाखल केला आहे. तसेच, सदर कामी अर्जदार यांनी सदरचा स्थगिती अर्ज दाखल करून, किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३१/२०२५ मध्ये मंजूर झालेले वारसा प्रमाणपत्र अंमलबजावणी या अर्जाच्या अंतिम आदेशापर्यंत स्थगित ठेवण्याची विनंती केलेली आहे. जाबदार यांनी निशाणी १५ वर म्हणणे दाखल करून अर्जदार यांचे कथन नाकारले आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. तसेच दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

३. अर्जदार या मयत शंकर कोंडीबा कांबळे व अक्काताई शंकर कांबळे यांची नात्याने मुलगी असून, मयत शंकर पश्चात त्या एकमेव वारस असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तर, जाबदार यांचे म्हणणे असे आहे की ते मयत शंकर कांबळे व चंपाबाई कांबळे यांचे एकमेव वारस आहेत. तसेच, जाबदार यांच्या मते अर्जदार या मयत शंकर यांचे भाऊ भास्कर कोंडीबा कांबळे यांची मुलगी आहेत. अर्जदार यांचे म्हणणे असे आहे की, जाबदार यांचा मयत शंकर यांच्याशी कोणताही संबंध नसताना

त्यांनी स्वतःला वारस भासवून न्यायालयाची दिशाभूल करून वारसा प्रमाणपत्र मिळवले आहे.

४. दोन्ही पक्षकारांनी अभिलेखावर कागदपत्रे सादर केलेली असून, सदर कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. अर्जदाराने स्वतःला मयत शंकर कांबळे यांची मुलगी व कायदेशीर वारस असल्याचा दावा केलेला असला तरी, अर्जदार ने तसे दर्शविणारा त्यांचे तोंडी कथनाव्यतरिक्त कोणताही प्रथमदर्शनी पुरावा प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही.

६. त्याचप्रमाणे, जाबदारनेही ते स्वतः मयत शंकर कांबळे यांचा मुलगा व कायदेशीर वारस असल्याचे प्रथमदर्शीनी पुराव्याने सिद्ध केलेले नाही. त्यांनी मुख्यतः पूर्वी च्या कि. दि. अर्ज क्र. ३१/२०२५ मधील प्रकरणात जाहीर नोटीस देऊन वारस प्रमाणपत्र मिळाल्याचा आधार घेतलेला आहे.

७. जाबदार यांनी असे कथन केले आहे की अर्जदार या मयत शंकर यांचे भाऊ भास्कर यांची मुलगी आहेत. सदर कथनास आधार देण्यासाठी जाबदार यांनी निशाणी–१४ कडे कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

८. सर्वप्रथम, निशाणी १४/२ कडे दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की शिवाजी राणोजी सुर्वे यांनी भास्कर कोंडीबा कांबळे यांना एक करारपत्र लिहून दिले असून, त्यामध्ये अर्जदार यांच्या नावाचा उल्लेख करून त्या भास्कर कोंडीबा कांबळे यांची मुलगी असल्याचे नमूद केलेले आहे.

९. तसेच, निशाणी १४/३ कडे दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राचे अवलोकन करता असे दिसते की सदर प्रतिज्ञापत्र शिवाजी भास्कर कांबळे यांनी

केलेले असून त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की शंकर कोंडीबा कांबळे व अक्काताई शंकर कांबळे हे मयत झाले असून त्यांना कोणतेही अपत्य नाही आणि ते स्वतः पुतण्या या नात्याने त्यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत.

१०. निशाणी १९ कडे अर्जदार यांनी हजर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यामध्ये अर्जदार यांनी निशाणी १९/३ कडे रे. दि. मु. नं. ३३८/२००४ मधील एक प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामध्ये अर्जदार यांनी त्यांचे वडील शंकर कोंडिबा कांबळे हे असलेचे नमुद केले आहे.

११. एकंदरीत, अर्जदार या मयत शंकर व अक्काताई यांची वारस असल्याचे कथन करत आहेत, तर जाबदार हे मयत शंकर व चंपाबाई यांचे वारस असल्याचे सांगत आहेत. तथापि, चंपाबाई कोण आहेत व त्या जाबदार यांची आई कशा प्रकारे आहेत, याबाबत दोन्ही पक्षकारांनी त्यांच्या कथनात कोणताही स्पष्ट उल्लेख केलेला नाही. मात्र शंकर यांच्या अक्काताई या पत्नी असलेचे जाबदार यांनी दाखल केलेल्या शिवाजी भास्कर कांबळे यांच्या प्रतिज्ञापत्रावरून प्रथमदर्शनी दिसुन येते.

१२. सदर शिवाजी भास्कर कांबळे यांचे प्रतिज्ञापत्र (निशाणी १४/३) स्वतः जाबदार यांनी दाखल केलेले असून त्यामध्ये देखील मयत शंकर व अक्काताई यांना कोणतेही अपत्य नसल्याचे नमूद आहे आणि ते पुतण्या या नात्याने कायदेशीर वारस असल्याचे म्हटले आहे. सदर प्रतिज्ञापत्रात जाबदार हे वारस असल्याचा कुठेही उल्लेख आढळून येत नाही. शिवाय, वर नमूद केल्याप्रमाणे जाबदार यांनी स्वतः मयत शंकर यांचे वारस असल्याबाबतचा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दाखल केलेला दिसून येत नाही.

१३. अभिलेखावरील उपलब्ध कथनावरून तसेच निशाणी १२ सोबत हजर केलेले कागदपत्रावरून असेही निदर्शनास येते की दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३१/२०२५ मध्ये मंजूर झालेल्या वारसा प्रमाणपत्राच्या आधारे जाबदार हे जयसिंगपूर नगरपालिका येथे त्यांच्या मुलगी अश्विनी कांबळे हिला नोकरी लावण्याच्या प्रयत्नात आहेत.

१४. अशा परिस्थितीत अर्जदार, जाबदार व पुतण्या (शिवाजी भास्कर कांबळे) यांचे प्रतिस्पर्धी कथने लक्षात घेता मयत शंकर कोंडीबा कांबळे यांचा वारस कोण हा प्रश्न चौकशीशिवाय या टप्यावर निश्चित करता येणार नाही.

१५. तथापि, जाबदार सदर प्रमाणपत्राच्या आधारे सेवा किंवा आर्थिक लाभ मिळविण्याचा प्रयत्न करीत असल्याचा अर्जदाराचा दावा विचारात घेता, अंतिम निर्णय होईपर्यंत विषयवस्तूचे संरक्षण करणे आवश्यक आहे. जर सदर वारसा प्रमाणपत्र स्थगित केले नाही आणि जर अर्जदार या, मयत शंकर यांच्या वारस असताना सुध्दा जाबदार यांनी त्यांचे नावे अर्जदार यांना वारस न दाखवता, वारसा दाखला घेतला असलेचे बाब सिद्ध करण्यात यशस्वी झाल्या, तर तत्पूर्वी मंजूर केलेल्या वारसा प्रमाणपत्राच्या आधारे जबाबदार यांनी त्याचा उपयोग करून नोकरी मिळविल्यास अथवा त्या आधारे त्यांचे मुलीला नोकरी दिल्यास अर्जदार यांचे अपूरणीय नुकसान होण्याची शक्यता आहे. उलटपक्षी, सदर प्रमाणपत्राच्या अंमलबजावणीस तात्पुरती स्थगिती दिल्यास जबाबदार यांचे कोणतेही अपूरणीय नुकसान होणार नाही.

१६. अशा परिस्थितीत सदर कामी नेमके मयत शंकर कांबळे यांचे वारस कोण याबाबत कोणत्याही पक्षाने प्रथमदर्शनी ठोस पुरावा अभिलेखावर सादर केलेला

नसला तरी अर्जदार, जाबदार अथवा पुतण्या (शिवाजी भास्कर कांबळे) यांची कथने लक्षात घेता मयत शंकर कोंडीबा कांबळे यांचा वारस कोण हे सदर प्रकरणी पाहणे गरजेचे आहे. त्यामुळे पूर्वीच्या अर्जामध्ये मंजूर केलेला वारस प्रमाणपत्र तसेच कार्यरत ठेवले तर जाबदार हे त्याचा उपयोग करून नोकरी अथवा इतर लाभ मिळवण्याची शक्यता नाकारता येत नाही. मयत शंकर यांचे खरे वारस कोण हे चौकशीअंती निश्चित होणार असल्याने, सद्यस्थितीत पूर्वी मंजूर केलेल्या वारस प्रमाणपत्राच्या अंमलबजावणीस स्थगिती देणे आवश्यक व न्यायोचित ठरते. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

**(अ)** अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**(आ)** किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३१/२०२५ मध्ये दिनांक २९/०९/२०२५ मध्ये निर्गमित करण्यात आलेल्या वारसा प्रमाणपत्राची अंमलबजावणी व परिणामकारकता या कार्यवाहीच्या अंतिम निर्णयापर्यंत स्थगित ठेवण्यात येत आहे.

PATIL MAYUR SAMPAT

Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2026.03.16 17:57:12 +0530

जयसिंगपुर

दि. १६/०३/२०२६

( **एम. एस. पाटील** )

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

जयसिंगपूर.